R.No. MHHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ५८

दि.११ फेब्रुवारी २०२६,वार: बुधवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## रमाई महिला मंडळाच्या वतीने मिलिंद नगर येथे रमाई जयंती उत्साहात साजरी

लातूर/ प्रतिनिधी :-रमाई महिला



मंडळाच्या वतीने मिलिंद नगर येथे रमाई जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमाची सुरुवात बौद्ध वंदना, त्रिशरण व पंचशील घेऊन करण्यात आली. माता रमाई यांच्या प्रतिमेला हार घालून अभिवादन करण्यात आले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमांचे पूजन करून वंदना घेण्यात आली.

या कार्यक्रमास रमा हनवते, रमा शृंगारे, शिमा जोगदंड, मीनाक्षी बनसोडे, इंदुबाई बनसोडे, मयुरी बनसोडे, सुष्मा कांबळे, कोमल कांबळे, अनुसया बनसोडे, रेखा कांबळे, दिपाली कांबळे, सुरेखा बनसोडे, माया उजगीरे, कविता जोगदंड, सुजाता कांबळे, उकाबाई भुतकर, वृंदावनी हिंगे, शारदा भुतकर, अनुराधा हिंगे, राजाबाई बनसोडे, बेबीनंदा बनसोडे, शीतल हिंगे, भारती गायकवाड, सुशिला कांबळे, अरुणा भुतकर, प्रभावती बनसोडे, मंगल बनसोडे, सुनीता बनसोडे, वंदना गायकवाड, उज्वला शृंगारे, पूजा बनसोडे आदी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




रमाई जयंतीच्या निमित्ताने महिलांनी एकत्र येत माता रमाई यांच्या त्याग, संघर्ष व सामाजिक योगदानाला उजाळा दिला. कार्यक्रमामुळे परिसरात सामाजिक प्रबोधनाचे व सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

विशेष म्हणजे, रमाई महिला मंडळाच्या वतीने दर रविवारी बौद्ध विहारांमध्ये बौद्ध वंदना घेण्याचा नियमित उपक्रम राबविला जातो. तसेच रमाई जयंतीनिमित्त उपस्थितांसाठी खिचडी वाटपाचाही कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचे खा.रजनीताई पाटील यांच्याकडून सांत्वन

केज/प्रतिनिधी□महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री



अजित दादा पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झाले.संपूर्ण महाराष्ट्र शोकाकुल झाला.

रविवार रोजी बारामती येथे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांची भेट घेऊन खा.रजनीताई अशोकराव पाटील यांनी सांत्वन केले.

यावेळी अश्रू अनावर झाले होते.जुन्या आठवणी मन सुन्न करून गेल्या.

महाराष्ट्राच्या राजकारणात अजित दादा पवार हे स्पष्टवक्तेपणा, परखडपणा यामुळे कायम स्मरणात राहतील.पाटील आणि पवार कुटुंबाचा कायम स्नेह होता.

पवार कुटुंबासाठी हा मोठा धक्का आहे. दुःखपेलल्या शिवाय पर्याय नाही ते क्रमप्राप्त आहे अशा भावना व्यक्त झाल्या.

## लातूरच्या महापौर आणि उपमहापौर यांनी पदभार स्वीकारला जनतेच्या जाहीरनाम्याची यशस्वी अंमलबजावणी होईल-आमदार अमित विलासराव देशमुख

लातूर / प्रतिनिधी: -नूतन



महापौर आणि उपमहापौर लातूर शहर महानगरपालिकेत, पारदर्शक, लोकाभिमुख, आणि गतिमान कारभार करतील. निवडणुकीपूर्वी लोकांच्या सूचना घेऊन काँग्रेस वंचित बहुजन आघाडीने जो जनतेचा जाहीरनामा प्रसिद्ध केलेला आहे, त्याची काटेकोर अंमलबजावणी नूतन पदाधिकारी आणि सर्व नगरसेवक मिळून करतील. जनतेला सर्व प्रकारच्या मूलभूत सोयी सुविधा विना तक्रार पोहोचवतील, संकल्पित योजनांना गती देतील असा विश्वास राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला.

लातुर महानगरपालिका निवडणूक निकाल नुकतेच लागल्यानंतर काँग्रेस आघाडीला मनपात एकहाती सत्ता मिळाली असून लातुर मनपाच्या महापौर पदी सौ. जयश्री सोनकांबळे तर उप महापौरपदी ड. स्नेहल उटगे यांची बिनविरोध निवड सोमवारी करण्यात आली होती. मंगळवार दि. १० फेब्रुवारी रोजी सकाळी लातूर शहर महानगरपालिकेत लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर सौ. जयश्री भालचंद्र सोनकांबळे व उपमहापौर ड. स्नेहल श्रीकांत उटगे यांचा पदभार स्वीकृती सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांसह लातूर शहर महानगरपालिकेत उपस्थित राहुन दोघांचेही मनःपूर्वक अभिनंदन केले, त्यांच्या आगामी कारकिर्दीस आमदार देशमुख यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.



यावेळी बोलातांना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी नूतन महापौर व उपमहापौरांचा यथोचित सन्मान करून त्यांना येणाऱ्या काळात लातुर महानगर पालिकेच्या माध्यमातून स्वच्छ, पारदर्शक, आणि लोकाभिमुख कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्त- श्रीमती मानसी मीना, उपायुक्त-वसुधा फड, लातूर शहर महानगरपालिकेचे गटनेते- विजयकुमार साबदे, माजी महापौर-प्रा. स्मिता खानापुरे, माजी महापौर नगरसेवक दीपक सुळ, माजी उपमहापौर- कैलास कांबळे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष-ऍड. किरण जाधव, वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष- तथा नगरसेवक सचिन गायकवाड, श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन सचिन पाटील, २१ शुगर्सचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हा. चेअरमन- ड. समद पटेल, भालचंद्र सोनकांबळे, प्रा. प्रवीण कांबळे, प्रवीण सूर्यवंशी, लक्ष्मीकांत मंठाळे, सुनील बसपुरे, बसवंतआप्पा भरडे, तबरेज तांबोळी, संजय निलेगावकर, सायरा पठाण, विष्णुदास धायगुडे, मीना टेकाळे, गणेश एस.आर. देशमुख, व्यंकटेश पुरी, प्रविण सुर्यवंशी, ड. गोपाळ बुरबुरे, गोरोबा लोखंडे, बिबीशन सांगवीकर, राजू गवळी, इनायत सय्यद, सिकंदर पटेल, दगडूआप्पा मिटकरी,हारून शेख, आयुब मणियार, नामदेव ईगे, यशवंत वाडीकर, बालाप्रसाद बिदादा, दत्ता सोमवंशी, डॉ. दिनेश नवगिरे, सूर्यकांत कातळे, शैलेश भोसले, रमेश बिराजदार, पवनकुमार गायकवाड, अमित जाधव, गोविंद सोदले, मुक्तार शेख, आबेद गोलंदाज, युनूस शेख, आबु मणियार, करीम तांबोळी, अब्दुल्ला शेख आदिसह लातूर शहर महानगरपालिकेतील काँग्रेस पक्ष नगरसेवक, वंचित बहुजन आघाडीचे सर्व नगरसेवक, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, लातूर शहर महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## इयत्ता बारावी परीक्षा केंद्रांवरील बैठे पथकांचा जिल्हाधिकारी वर्षा,ठाकूर-घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना यांनी घेतला आढावा

लातूर- जिल्ह्यातील १०१ परीक्षा



केंद्रांवर आजपासून इयत्ता बारावी परीक्षा सुरू झाली आहे. ही परीक्षा कॉपीमुक्त आणि भयमुक्त वातावरणात होण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्या आहेत. सर्व परीक्षा केंद्रांवर तीन अधिकारी, कर्मचारी

यांचे बैठे पथक तैनात करण्यात आले असून या पथकामार्फत परीक्षा केंद्रांवर निगराणी ठेवण्यात येत आहे.

आज पहिल्याच दिवशी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे आणि मुख्य कार्यकारीअधिकारी राहूल कुमार मीना यांनी जिल्हा परिषदेत इयत्ता बारावीपरीक्षेसाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष कक्षातून दूरदृश्य प्रणालीद्वारे सर्व बैठे पथकांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी बैठे पथकांतील सदस्यांकडून परीक्षा केंद्रांवरील उपाययोजनांची माहिती घेतली. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे परीक्षा केंद्र परिसराची पाहणी केली. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा ल्या.

बैठे पथकांतील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी सतर्क राहून काम करावे. कोणत्याही परीक्षा केंद्रांवर व परिसरात अनधिकृत व्यक्तींना प्रवेश देवू नये. एखाद्या परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार ाल्याचे निदर्शनास आल्यास कठोर कार्यवाही केली जाईल. भरारी पथकांच्या माध्यमातूनही विविध परीक्षा केंद्रांवर निगराणी ठेवण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या.

परीक्षा केंद्रांवर नियुक्त बैठे पथकातील सदस्यांनी एकाच ठिकाणी न थांबता परीक्षा केंद्रांच्या परिसरात कोणतेही गैरप्रकार होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. जिल्हास्तरीय नियंत्रण कक्षातून सातत्याने बैठे पथकांचा आढावा घेण्यात येईल, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना यांनी सांगितले.

सामान्य प्रशासनाच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी डॉ. दत्तात्रय मठपती, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यावेळी उपस्थित होत्या.

# ५९ सदस्यांची जिल्हा परिषद : लोकशाही की सौदेबाजी?

लातूरच्या सत्तेचा फैसला बंद दाराआड की जनतेसमोर?

लातूर जिल्हा परिषद निवडणूक निकालानंतर एक गोष्ट ठळकपणे समोर आली आहेलोकांनी कौल दिला आहे, पण सत्ता कुणाला द्यायची हे लोक ठरवत नाहीत, ते काही मोजके नेते ठरवतात. ५९ सदस्यांच्या जिल्हा परिषदेत स्पष्ट बहुमत न मिळणे हा केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर लोकशाहीच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न आहे.

काँग्रेस २३ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला आहे, भाजप १८ जागांवर अडकला आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) १२ जागांसह सत्तेचा कणा बनला आहे. याशिवाय मनसेचा एक, दोन अपक्ष, शिंदे गटाची एक, उभाठा सेनेची एक आणि शरद पवार गटाची एक जागाही सगळी तुटपुंजी मते आता सत्तेची नाणी बनली आहेत.

सत्ता जनतेची की नेत्यांची मक्तेदारी?

आज लातूर जिल्ह्यातील प्रश्न असा आहेसत्ता जनतेसाठी की नेत्यांच्या सोयीसाठी? बहुमतासाठी आवश्यक आकडा गाठण्यासाठी आता विचार, कार्यक्रम किंवा विकास नव्हे, तर कोण कुणाच्या बाजूला उभा राहतो हेच महत्त्वाचे ठरत आहे. हे चित्र लोकशाहीसाठी चिंताजनक आहे.

अजित पवार गट : किंगमेकर की सत्तेचा दलाल?

१२ सदस्यांसह अजित पवार गट आज जिल्हा परिषदेचा निर्णायक ठरला आहे. पण प्रश्न असा आहेहा गट विकासाचा किंगमेकर ठरणार की सत्तेचा सौदागर? जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, स्थायी समित्या, निधी नियंत्रणया सगळ्याच्या बदल्यात पाठिंबा दिला जाणार का? की जनतेच्या अपेक्षा केंद्रस्थानी असणार?

दोन आमदार, दोन कल, एक मोठा संशय

या सत्तानाट्याच्या केंद्रस्थानी आहेत माजी मंत्री संजय बनसोडे आणि आजी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील. राजकीय चर्चांनुसार संजय बनसोडे यांचा कल भाजपकडे आहे, तर बाबासाहेब पाटील काँग्रेसकडे झुकत असल्याचे सांगितले जाते. म्हणजेच लातूर जिल्ह्याच्या भवितव्याचा निर्णय दोन व्यक्तींच्या वैयक्तिक राजकीय सोयीवर ठरणार का, असा थेट प्रश्न उपस्थित होतो.

हे केवळ पक्षीय समीकरण नाही; हा विश्वासघाताचा धोका आहे. कारण जनतेने मतदान करताना हे गणित डोळ्यांसमोर ठेवलेले नव्हते.

छोटे पक्ष : मत कमी, किंमत जास्त

मनसेचा एक सदस्य, अपक्षांचे दोन, शिंदे गट, उभाठा आणि शरद पवार गट प्रत्येकी एकही मते आज सोन्याच्या भावात विकली जात आहेत का, असा प्रश्न विचारला जातो. कारण जेव्हा सत्ता तोलामोलाची असते, तेव्हा एक मतही सरकार बनवते आणि सरकार पाडते.

जिल्हा परिषद म्हणजे खेळण्याची वस्तू नाही

लातूर जिल्हा परिषद म्हणजे अध्यक्ष-उपाध्यक्षांची खुर्ची नव्हे. ही संस्था म्हणजे हजारो गावांचे पाणी, शेतकऱ्यांचे प्रश्न, महिलांचे आरोग्य, विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि बेरोजगार तरुणांचे भवितव्य. जर ही संस्था सौदेबाजीच्या राजकारणात अडकली, तर त्याची किंमत सामान्य जनतेला मोजावी लागेल.

जनतेचा कौल : स्पष्ट इशारा

जनतेने स्पष्ट बहुमत दिले नाही, हा योगायोग नाही. हा इशारा आहेअहंकार नको, समन्वय हवा. पण आज जे चित्र दिसते आहे, त्यावरून समन्वयापेक्षा स्वार्थ, स्थैर्यापेक्षा सत्ता आणि लोकशाहीपेक्षा राजकीय अंकगणित वरचढ ठरत असल्याची भीती आहे.

अंतिम प्रश्न

लातूर जिल्हा परिषदेची सत्ता

विकासासाठी वापरली जाणार की दबावासाठी?

स्थैर्य देणार की अस्थिरतेचा बाजार उघडणार?

जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणार की नेत्यांच्या करारांची पूर्तता करणार?

या सगळ्याची उत्तरे येत्या काही दिवसांत मिळतील. पण एक गोष्ट निश्चितहा निर्णय इतिहासात नोंदवला जाईल. आणि तो निर्णय घेणाऱ्यांची नावेही.

सत्ता येते आणि जाते, पण लोकांचा विश्वास तुटला तर तो परत जोडणे अवघड असते. लातूर जिल्हा परिषदेतील सत्तास्थापना हा केवळ राजकीय निर्णय नसून लोकशाहीची कसोटी आहेआणि ती कसोटी सध्या अत्यंत कठीण आहे.

# पुण्यानुमोदन व शोक निवारणसभा एक चिंतन....

बौद्ध धम्म मानवाच्या संपूर्ण जीवनाला नैतिकता, प्रज्ञा आणि करुणेने घडविण्याची शिकवण देतो.बौद्ध परंपरेतील जीवनसंस्कार हे मानवाला सजग आणि करुणामय बनवतात. जन्मापासून मृत्यूपर्यंतचा प्रवास धम्ममूल्यांनी , संस्काराने समृद्ध करण्याची ही सुंदर परंपरा आहे. त्यामुळे व्यक्तीचे जीवन अर्थपूर्ण होते. जीवनाला नैतिक दिशा मिळते.व्यक्तिमत्त्व शुद्ध व संतुलित बनते.समाजात मैत्री, करुणा आणि समता वाढते.अंधश्रद्धेपेक्षा विवेकालामहत्त्व दिले जाते. धम्म जीवनात ही संस्कारीता अतिशय महत्त्वाची आहे.त्यामुळे जीवनातील प्रत्येक टप्पा धम्माशी जोडला जातो.

बौद्ध धम्म हा करुणा, मैत्री आणि सदाचार शिकवणारा धम्म आहे. या धम्मात पुण्यानुमोदन ही अतिशय सुंदर आणि उच्च भावना मानली जाते. पुण्यानुमोदन म्हणजे दुसऱ्याने केलेल्या चांगल्या कर्मात मनापासून आनंद व्यक्त करणे.समाजात अनेक वेळा लोक एकमेकांच्या यशावर मत्सर भावना मनात येते. पण बौद्ध धम्म आपल्याला याउलट शिकवतो. धम्म दुसऱ्याच्या चांगुलपणात आनंद मानणेस शिकवतो. ही भावना मनाला हलकं करते, द्वेष व इर्ष्या कमी करते आणि अंत:करण शुद्ध करते.

पुण्यानुमोदनामुळे आपल्यात करुणा आणि मैत्री वाढते. आपण इतरांच्या आनंदात सहभागी होतो. त्यामुळे समाजात प्रेम, सहकार्य आणि एकता निर्माण होते. बुद्धांनी सांगितले आहे की, इतरांच्या पुण्यात आनंद मानणे हेही पुण्यकर्मच आहे. त्यामुळेही मन शुद्ध होतं.

म्हणूनच पुण्यानुमोदन हे फक्त धम्मकार्य नव्हे, तर सामाजिक आणि नैतिक मूल्य आहे.मानवी जीवन अनित्य आहे. जन्म झाला की मृत्यू अटळ आहे, हेच भगवान बुद्धांनी स्पष्टपणे सांगितले. बौद्ध धम्म मृत्यूकडे भीतीने किंवा अंधश्रद्धेने पाहत नाही, तर तो समज, करुणा आणि शांतीने स्वीकारण्याची शिकवण देतो. मृत्यूपश्चात स्मरणदिवशी घेतले जाणारे पुण्यानुमोदन आणि शोक निवारण सभा हे त्याचेच सुंदर उदाहरण आहे.पुण्य म्हणजे चांगले कर्म आणि अनुमोदन म्हणजे आनंदाने स्वीकार करणे. मृत व्यक्तीच्या पुण्यकर्माचे स्मरण करणे. त्या पुण्यकर्मास अनुमोदन देणे.

या दिवशी भिक्खू संघाला दान देणे, अन्नदान करणे, बुद्धवंदना, त्रिशरण-पंचशील ग्रहण करणे,धम्म प्रवचन यांसारखे कार्यक्रम होतात. या सर्व चांगल्या कर्मांचा उद्देश असा असतो की, त्या पुण्याचा लाभ सर्वांना होवो आणि दिवंगत व्यक्तीच्या स्मृतीला आदर मिळो.

पुण्यानुमोदनामुळे मृत व्यक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त होते. त्याच्या चांगल्या गुणांची आठवण जपली जाते. दुःखात बुडून न जाता, त्याचे रूपांतर सद्कर्मात केले जाते. त्यामुळे मन शुद्ध होते आणि कुटुंबीयांना मानसिक बळ मिळते.

मृत्यूमुळे कुटुंबीयांच्या मनात दुःख, पोकळी आणि असहायता निर्माण होते. हे दुःख कमी करून त्यांना धीर देण्यासाठी घेतली जाणारी सभा म्हणजे शोक निवारण सभा.

या सभेत धम्मदेशना आणि मृत व्यक्तीच्या चांगल्या आठवणी सांगितल्या जाव्यात. धम्मोपदेशातून सर्व वस्तू अनित्य आहेत ही शिकवण दिली जावी. जन्म, जरा आणि मरण हा निसर्गाचा नियम आहे, हे समजावले जावे. त्यामुळे मन हळूहळू समत्वाकडे (उपेक्षा) जाऊ शकेल.शोक निवारण सभेचा मुख्य उद्देश म्हणजे दुःखात अडकून न राहता, जीवनाचा स्वीकार करून पुढे जाण्याची प्रेरणा देणे हा असावा. ही सभा कुटुंबाला भावनिक आधार देते. बौद्ध धम्म मृत्यूकडे नकारात्मक दृष्टीने न पाहता, तो शिकवतो की, मृत्यू हा जीवनाचा नैसर्गिक भाग आहे. मृत व्यक्तीच्या स्मरणार्थ पुण्यकर्म करणे आणि शोकग्रस्तांना धीर देणे हीच खरी श्रद्धांजली आहे. त्यामुळे समाजात प्रेम, सहकार्य आणि मानसिक शांती निर्माण होते.

पुण्यानुमोदन आणि शोक निवारण सभा या बौद्ध धम्मातील अत्यंत अर्थपूर्ण आणि मानवतावादी परंपरा आहेत. शोक निवारण सभा ही दुःख कमी करण्यासाठी, धीर देण्यासाठी आणि जीवनाच्या अनित्यत्वाची जाणीव करून देण्यासाठी आयोजित केली जाते. तिला शोकसभा म्हणणे उचित होणार नाही. बौद्ध धम्माच्या दृष्टीने ही सभा अत्यंत शांत, साधी आणि अर्थपूर्ण असावी, मात्र आजकाल या सभांमध्ये एक वेगळी प्रवृत्ती दिसून येते.आगंतुक ,काहीबाही बोलणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. ही बाब चिंतन करण्यासारखी आहे.

शोक निवारण सभेचा मूळ उद्देश असतो की, धम्मोपदेशातून सर्व वस्तू अनित्य आहेत ही शिकवण समजावून सांगणे, तसेच मृत व्यक्तीच्या कार्याचा उचित गौरवही व्हावा.परंतु जेव्हा अनेक लोक दीर्घकाळ बोलतात, तेव्हा सभा लांबते आणि वातावरण अधिक भावनिक व निरसपूर्ण बनते. कुटुंबीय आधीच दुःखात असतात; अशा वेळी लांबलचक भाषणे त्यांचा मानसिक थकवा वाढवू शकतात.

काही वेळा असेही दिसते की, मृत व्यक्तीच्या स्मृतीपेक्षा वक्ते स्वतःच्या ओळखी, सामाजिक कार्य किंवा विचार मांडण्यात अधिक वेळ घालवतात. यामुळे सभेचे स्वरूप बदलून ते जणू एखाद्या भाषण कार्यक्रमासारखे होते. बौद्ध धम्म मात्र साधेपणा, संयम आणि सम्यक वाणी यावर भर देतो. योग्य वेळी, सत्य आणि हितकारक असे थोडक्यात बोलणे हाच धम्माचा मार्ग आहे.

याशिवाय, खूप वक्ते असल्यास सभेचा मुख्य केंद्रबिंदू धम्मदेशना व मृत व्यक्तीचा गुणगौरव मागे पडतो. प्रत्यक्षात शोक निवारण सभेत धम्मोपदेशाला सर्वाधिक महत्त्व असले पाहिजे. कारण धम्मच मनाला स्थैर्य देतो. आणि दुःख स्वीकारण्याची ताकद देतो.

म्हणूनच अशा सभांमध्ये वक्त्यांची संख्या मर्यादित ठेवणे आवश्यक आहे. सभा संक्षिप्त, शांत आणि अर्थपूर्ण असली तरच ती खऱ्या अर्थाने शोक निवारण ठरेल.

शोक निवारण सभा ही प्रदर्शनाची जागा नसून संवेदना व्यक्त करण्याची आणि मनाला आधार देण्याची प्रक्रिया आहे. बोलणाऱ्यांची संख्या वाढल्यास खरा उद्देश हरवण्याची शक्यता असते. म्हणून धम्मसुसंगत, मर्यादित आणि मनापासून बोलणे हाच योग्य मार्ग आहे. यासाठी संघटनांनी एकत्र येऊन उचित बदल करणे कालसंगत ठरेल.

**किशोर कासारे**
**मंडणगड (दाभट)**
**८७६७४२५१८०**

# महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे हिरक महोत्सवी अधिवेशन उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार उद्घाटन

लातूरः महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे हिरक महोत्सवी,कोकण विभाग ग्रंथालय संघाचे २७ वे आणि रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाचे ४९ वे अधिवेशन दि.२१ व २२ फेब्रुवारी २०२६ रोजी रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघ आणि स्व.आम. कुसुमताई अभ्यंकर ग्रंथालय संघ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी समर्थ मंगल कार्यालय,साळवी स्टॉप. ता.जि.रत्नागिरी येथे आयोजित केले असून,या तिहेरी अधिवेशनाचे उद्घाटन राज्याचे उद्योग मंत्री पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते दि.२१ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता होणार आहे.

सदर संयुक्त अधिवेशनाच्या निमित्ताने दि.२१ फेब्रुवारी २६ रोजी सकाळी ८.३० वाजता नवलाई देवी मंदीर ते अधिवेशन स्थळ दरम्यान ग्रंथदिंडी निघणार आहे. त्यानंतर १० वाजता राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशनाचे उद्घाटन उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी महसूल व गृह राज्यमंत्री योगेश कदम यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.स्वागताध्यक्ष उद्योजक दीपकशेठ गद्रे असून, साहित्यिक कृष्णाजी कुलकर्णी व गंरथसखा विश्वस्त श्याम जोशी हे मार्गदर्शन होणार आहे.यावेळी राज्याचे ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, कोकण विभागाचे सहा.ग्रंथालय संचालक प्रशांत पाटील,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील, प्रमुख कार्यवाह सोपानराव पवार, कार्योपाध्यक्ष ग्रंथमित्र राम मेकले, कोषाध्यक्ष भिमराव पाटील, कोकण विभाग गंरथालय संघाचे अध्यक्ष दिलीप कोरे,स्थाई समिती सचिव सुनील कुबल, ग्रंथालय कर्मचारी प्रतिनिधी ग्रंथमित्र नंदू



बनसोड यांची मंचावर उपस्थिती लाभणार आहे.या सत्राचे प्रास्ताविक रवींद्रकुमार तथा भाई कालेकर हे करणार असून, सूत्रसंचालन अंजली बर्वे व श्रीकांत पाटील हे करतील.

दुपारी १२.३० ते २ या दरम्यान पुरस्कार प्रदान आणि सार्वजनिक ग्रंथालयाची आर्त्मनिर्भरता या विषयावरचा पहिला परिसंवाद दिलीप कोरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यात ठाणे जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष चांगदेव काळे,ग्रंथ निवड समितीचे माजी सदस्य ग्रंथमित्र कुंडलिक मोरे, नईस खान पठाण नाशिक, अंजली बर्वे रत्नागिरी व अरविंद कुलकर्णी देवरुख हे विचार मांडणार आहेत.

दुपारी ३ ते ४ या वेळात मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र खंडेराव सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक ग्रंथालयाचे संगणकीकरण आणि डिजिटलायझेशन या विषयावर होणाऱ्या परिसंवादात भगवान घेरडे, मनिषा सावंत, संतोष चतुर्भूज हे मार्गदर्शन करणार आहेत.

दुपारी ४ ते सायंकाळी ५ दरम्यान अमरावती विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर घुगे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालयांनी अनुदानाव्यतिरीक्त उत्पादनाची साधने कशी वाढवावीत? या विषयावर चर्चा सत्र होईल.सायंकाळी ५.३० ते ७ या वेळात महाराष्ट्र राज्य गंरथालय संघ, कोकण विभाग ग्रंथालय संघ आणि रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाची सर्वसाधारण सभा होणार आहे.रात्री ७ ते ९ या वेळात गायक गुरुदेव नांदगावकर आणि सहकलाकारांचा अभिजात मराठी भावगीतांचा गंध फुलांचा हा सुमधूर कार्यक्रम आयोजिला आहे.

रविवार,दि.२२ फेब्रुवारी नाशिक विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष दत्ता परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली रत्नागिरीतील शताब्दी ग्रंथालये या विषयावर परिसंवाद होणार आहे.यामध्ये दिपक पटवर्धन,मधुरा जोशी, अरुण इंगवले,गजानन जोशी,जयंत अभ्यंकर हे विचार व्यक्त करणार असून, समारोप रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष संभाजी सावंत हे करणार आहेत.

सकाळी ११ ते १ या वेळामध्ये नागपूर विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष शिवकुमार शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालय चळवळीचा मुळाधार-ग्रंथालय सेवक या विषयावर होणाऱ्या परिसंवादात सिंधुदुर्ग जिल्हा ग्रंथालय संघाचे सदस्य संजय शिंदे, रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाचे संचालक राकेश आंबेकर, कोलगाव मुक्तद्वार ग्रंथालयाचे ग्रंथपाल पूनम नाईक हे विचार व्यक्त करणार आहेत.

दुपारी १ ते ३ दरम्यान या अधिवेशनाचे खुले व समारोप सत्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजानन कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून,यावेळी राज्य ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर,सर्व विभागाचे सहा.ग्रंथाल संचालक अनुक्रमे प्रशांत पाटील,शालिनी इंगोले,डॉ. राजेश पाटील,रामदास साठे, सुनील हुसे,स.र.जोपुळे,रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय अधिकारी शशांक नाईक, ग्रंथालय निरीक्षक हेमंत काळोखे यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे.

तेव्हा लातूर जिल्ह्यातील ग्रंथालय चालक,ग्रंथालय कर्मचारी व ग्रंथप्रेमींनी या तिहेरी अधिवेशनाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून ग्रंथालय चळवळी वृध्दींगत करावे असे आवाहन राज्य ग्रंथालय संघाचे राज्या कार्योपाध्यक्ष राम मेकले, लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र प्रभाकर कापसे,कार्याध्यक्ष डॉ.ब्रिजमोहन झंवर, जिल्हा उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव, कोषाध्यक्ष राम मोतीपवळे, सहकार्यवार काशिनाथ बोडके, संचालक सर्वश्री हावगी बेरकीळे, सूर्यकांत शिरसे, किरण बाबळसूरे, अशोक खोडवे,श्रीधर स्वामी, जहांगीर सय्यद, नंदकुमार घोगरे, अनिल पाटील,गुप्तलिंग स्वामी, संतोष करमले,काशिनाथ साहू, बाळकृष्ण होळीकर, तुकाराम सुगावकर, बालाजी सूर्यवंशी,गोकर्णा सूर्यवंशी, राजकुमार सोनी, नागनाथ बिरादार, डॉ.अमित म्हेत्रे व रामचंद्र तिरके यांनी केले आहे.

# माझ्या रमाई मातेमुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर घडले. व्ही.एस. पँथरचे सं. अध्यक्ष विनोद खटके यांचे प्रतिपादन









लातूर / प्रतिनिधी :-मिलिंद नगर हे सामाजिक व बौद्ध चळवळीचे केंद्रबिंदू असून येथील बौद्ध विहारातील महिलांना बौद्ध वंदना तोंडपाठ असल्याचे पाहून अपार आनंद झाला. महिलांमधील ही बौद्ध जाणीव पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारत बौद्धमय व्हावे हे स्वप्न साकार होत असल्याचे वाटते, असे प्रतिपादन व्ही.एस. पँथरचे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांनी केले.

ते ७ फेब्रुवारी रोजी मिलिंद नगर येथे माता रमाई जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात महिलांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी त्यांनी माता रमाई यांच्या त्यागाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, माझ्या रमाई मातेमुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर घडले. बाबासाहेबांनी समाजासाठी आयुष्य समर्पित केले, तर माता रमाई यांनी संसाराचा गाडा समर्थपणे चालवला. संसार कसा सांभाळावा, त्याग आणि संयम कसा असावा, हे माता रमाई यांच्याकडून शिकावे.

या कार्यक्रमाचे आयोजन मिलिंद नगर रमाई महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात बौद्ध वंदना, त्रिशरण व पंचशील घेऊन करण्यात आली. त्यानंतर माता रमाई यांच्या प्रतिमेला हार घालून अभिवादन करण्यात आले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन व वंदना करण्यात आली.

यावेळी बोलताना विनोद खटके यांनी मिलिंद नगर रमाई बुद्ध विहारासाठी लवकरच बुद्धमूर्ती भेट देणार असल्याची घोषणा केली. या घोषणेमुळे उपस्थितांमध्ये समाधान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमास रमा हनवते, रमा शृंगारे, शिमा जोगदंड, मीनाक्षी बनसोडे, इंदुबाई बनसोडे, मयुरी बनसोडे, सुष्मा कांबळे, कोमल कांबळे, अनुसया बनसोडे, रेखा कांबळे, दिपाली कांबळे, सुरेखा बनसोडे, माया उजगीरे, कविता जोगदंड, सुजाता कांबळे, उकाबाई भुतकर, वृंदावनी हिंगे, शारदा भुतकर, अनुराधा हिंगे, राजाबाई बनसोडे, बेबीनंदा बनसोडे, शीतल हिंगे, भारती गायकवाड, सुशिला कांबळे, अरुणा भुतकर, प्रभावती बनसोडे, मंगल बनसोडे, सुनीता बनसोडे, वंदना गायकवाड, उज्वला शृंगारे, पूजा बनसोडे आदी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

रमाई जयंतीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम सामाजिक प्रबोधन, बौद्ध विचार आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणारा ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## लातुरात कामगारांचा गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार विराट मोर्चा;मोर्चात सहभागी होण्याचे कामगार नेते -राजकुमार होळीकर यांचे आवाहन



लातूर: केंद्रातील मोदी सरकारने कामगारांचे हक्क आणि अधिकार असलेले २९ कामगार कायदे रद्द करून नवीन चार कायदे लेत. हे नवीन चार कायदे कामगारांना व कर्मचाऱ्यांना गुलाम बनवणारे असल्याने ते त्वरित परत घ्यावेत. या व अन्य विविध मागण्यासाठी अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने दि. १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता साहित्यरत्न

अण्णाभाऊ साठे चौक ते जुने जिल्हाधिकारी कार्यालय, शिवाजी चौक लातूर येथे विराट मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात लातूर जिल्ह्यातील कष्टकरी, श्रमिक व कामगार बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. असे आवाहन अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. मोदी सरकारने कामगारांच्या हिताचे तब्बल २९ कायदे रद्द करून चार नवीन कायदे केले आहेत. त्यामुळे कामगार वर्गाचे मोठे नुकसान होणार आहे. कामगारांची पिळवणूक करून त्यांना उध्वस्त करण्याचा डाव भाजप सरकारचा आहे. घरेलू कामगार, बांधकाम कामगार,

माथाडी कामगार, कंत्राटी कामगार यांच्या हक्क आणि अधिकारांचे रद्द केलेले २९ कामगार कायदे पुन्हा प्रस्थापित करून त्याची अंमलबजावणी करा, कामाच्या तासांत वाढ करू नका, कायम स्वरूपी बारमाही कामामध्ये कंत्राटी कामगार पद्धत बंद करा. सरकारी, निमसरकारी, सार्वजनिक उद्योग, सेवा उद्योग, नगरपालिका, महानगर पालीका अशा ठिकाणी अस्थाई वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कंत्राटी, हंगामी, रोजदारी, मानधनावरील कामगाराना/कर्मचाऱ्यांना विनाअट कायम करा. लोकशाही व स्वातंत्र्य हिरावून घेणारा महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा रद्द करा, नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पाल्याना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सहाय्य योजनेत कोणताही बदल न करता त्या पूर्ववत चालू ठेवावे आदी मागण्यासाठी गुरुवारी १२ फेबुवारी सकाळी ११-३० वाजता लातूर शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथून जुने जिल्हाधिकारी कार्यालयावर कामगारांचा विराट मोर्चा धडकणार आहे. कामगार, कष्टकरी, श्रमिकांनी १२ फेब्रुवारीच्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कामगार नेते राजकुमार होळीकर यांच्यासह संघटनेचे उपाध्यक्ष सुरेश काटे, सचिव शिवाजी भंडारे, इंजि. शफी शेख, लातूर तालुकाद्यक्ष अंकुश टकळगे, शहर सचिव महेंद्र कांबळे, प्रमोद बानाटे, बळीराम कांबळे, किशोर सगर, मंगळताई शिंदे, नूतन अंगरखे, अनिता काकरे, चंद्रपाल गिरी, भागवत पांचाळ आदींनी केले आहे.

## ज्वेल ऑफ नवी मुंबई पार्क येथील गौत्तम बुद्धांच्या मूर्तीला गेले तडे, पुन्हा नव्याने पंचधातू किंवा ब्रांजच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करा..!




नवी मुंबई / :- दिनांक १०/०२/ २०२६ रोजी नवी मुंबई महानगरपालिके च्या नवनिर्वाचित महापौर सौ. सुजाता सुरज पाटील (मॅडम) यांची नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयात जाऊन त्यांच्या दालना मध्ये भेट घेतली व महापौर झाल्याबद्दल नवी मुंबई रिपब्लिकन सेना (राष्ट्रीय अध्यक्ष बहुजन हृदय सम्राट, तरुणांचे प्रेरणास्थान, सर सेनानी आनंदराज आंबेडकर व महाराष्ट्राचे युवा नेते ऍडव्होकेट अमन के. एच. हनवते आंबेडकर) यांच्या वतीने भारतीय संविधान पुस्तिका भेट देऊन त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला, व बऱ्याच नवी मुंबईच्या समस्यांविषयी निवेदन सुद्धा देण्यात आले. या मध्ये प्रामुख्याने नेरूळ नवी मुंबई येथील ज्वेल ऑफ नवी मुंबई उद्यानामध्ये बसविण्यात आलेल्या तथागत भगवान गौत्तम बुद्धांच्या मूर्तीला तडे गेलेले आहेत ती मूर्ती ताबडतोब बदली करावी व मूर्तीच्या देखभालीसाठी कायमस्वरूपी शासकीय कर्मचारी नेमावा किंवा त्या ठिकाणी धम्म सेवकाची नियुक्ती करण्यात यावी अशी विनंती करण्यात आली.

याप्रसंगी नवी मुंबईतील रिपब्लिकन सेनेच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्ते नेते व महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## संगणक-लॅपटॉप दरवाढीचा फटका; रॅम-एसएसडी-प्रोसेसर महागले

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :संगणक व लॅपटॉपसाठी अत्यावश्यक असलेल्या रॅम (RM$^2$), एसएसडी (SSD) आणि प्रोसेसर या प्रमुख घटकांच्या किमतीत गेल्या काही महिन्यांत लक्षणीय वाढ झाली आहे. या दरवाढीचा थेट परिणाम देशभरातील संगणक बाजारपेठेवर झाला असून, परिणामी लॅपटॉप आणि डेस्कटॉप संगणकांचे दर वाढले आहेत.

देशात डिजिटल शिक्षण, ऑनलाइन व्यवहार, आयटी सेवा तसेच औद्योगिक क्षेत्रात संगणकाचा वापर सातत्याने वाढत असताना, वाढलेल्या किंमतींमुळे सर्वसामान्य ग्राहक, विद्यार्थी आणि लघुउद्योगांवर आर्थिक ताण वाढला आहे. व्यापारी सूत्रांच्या माहितीनुसार, मागील काही महिन्यांत लॅपटॉप व संगणकांच्या किमतींमध्ये सरासरी ५ ते १५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे.

विशेषतः ३० ते ५० हजार रुपयांच्या बजेटमधील लॅपटॉप, विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त मॉडेल्स तसेच कार्यालयीन वापरासाठीचे संगणक या श्रेणीत दरवाढ अधिक जाणवत आहे. दिल्ली, मुंबई, पुणे, बंगळुरू यांसारख्या महानगरांसह मराठवाडा, विदर्भ व उत्तर भारतातील ग्रामीण भागातही या दरवाढीचा परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहे.

दरवाढीची प्रमुख कारणे

१) जागतिक सेमीकंडक्टर पुरवठा साखळीतील तणाव :रॅम, एसएसडी व प्रोसेसर हे घटक सेमीकंडक्टर आणि चीप उद्योगावर आधारित आहेत. तैवान, चीन, दक्षिण कोरिया व अमेरिका येथे होणाऱ्या उत्पादनावर कोविडनंतरचे अडथळे, वाहतूक खर्चात वाढ व पुरवठा साखळीतील समस्या यांचा परिणाम झाला असून, त्यामुळे घटकांची उपलब्धता कमी होऊन दर वाढले आहेत.

२) ख व डेटा सेंटर्समुळे वाढती मागणी :कृत्रिम बुद्धिमत्ता (ख), क्लाउड कंप्युटिंग व डेटा सेंटर्सच्या झपाट्याने होणाऱ्या विस्तारामुळे उच्च क्षमतेची रॅम, वेगवान एसएसडी व प्रगत प्रोसेसरची मागणी वाढली आहे. यामुळे ग्राहक बाजारासाठी उपलब्ध घटक कमी पडत असून किंमती वाढत आहेत.



३) कच्च्या मालाच्या किंमतीत वाढ :सेमीकंडक्टर आणि चीप निर्मितीसाठी लागणाऱ्या सिलिकॉन, तांबे, कोबाल्ट आदी खनिजांच्या जागतिक किमती वाढल्याने उत्पादन खर्चात वाढ झाली असून, त्याचा भार ग्राहकांवर टाकला जात आहे.

४) डॉलरच्या विनिमय दराचा परिणाम :भारतात संगणक घटकांचा मोठा वाटा आयातीवर अवलंबून आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयाच्या विनिमय दरातील बदलामुळे आयात खर्च वाढून संगणक महाग झाले आहेत.

५) जीएसटी व आयात शुल्क :इलेक्ट्रॉनिक वस्तूंवरील जीएसटी, आयात शुल्क व वाहतूक खर्चामुळे भारतातील अंतिम किंमती वाढत आहेत.शिक्षण क्षेत्रावर मोठा परिणामडिजिटल शिक्षण, ऑनलाइन वर्ग व स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना लॅपटॉप अनिवार्य झाला आहे. मात्र वाढलेल्या किमतींमुळे ग्रामीण व मध्यमवर्गीय कुटुंबांवर आर्थिक ताण वाढला आहे. मराठवाड्यातील अनेक पालकांनी सांगितले की, शिक्षणासाठी संगणक गरजेचा असताना किंमत वाढल्याने खरेदी करणे कठीण झाले आहे.

लघुउद्योग व व्यावसायिकांनाही फटका-लघुउद्योग, कार्यालये, कोचिंग क्लासेस व डिजिटल व्यवसायांसाठी संगणक अत्यावश्यक असतानाही, दरवाढीमुळे नवीन खरेदी पुढे ढकलली जात आहे तसेच अपग्रेडचा खर्च वाढला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, नांदेड व लातूर येथील विक्रेत्यांच्या मते विद्यार्थ्यांची मागणी कायम असली तरी ग्राहक स्वस्त पर्यायांकडे वळत आहेत. असे प्रतिपादन श्रीजी कॉम्प्युटर्स न्ड टेकनिकल सेर्विसेसचे संचालक तथा संगणक तज्ज्ञ अशोक गुरनाळे यांनी केले आहे.

पुढील काळात दर कमी होणार?

तज्ज्ञांच्या मते, येत्या काही महिन्यांत रॅम व एसएसडीच्या दरात काही प्रमाणात स्थिरता येण्याची शक्यता असून, उत्पादन क्षमता वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# रमाईंचे जीवन म्हणजे संघर्षातून उभे राहिलेले सामाजिक आरोग्याचे बळ-डॉ.रेखा गायकवाड



लातूर : रमाई आंबेडकर यांचे संपूर्ण जीवन हे त्याग, संयम आणि कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेणारे होते. त्यांनी सहन केलेले हाल आजच्या समाजासाठी आरोग्य, स्वच्छता व स्त्रीसशक्तीकरणाचा संदेश देतात. निरोगी समाज घडवायचा असेल तर महिलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सक्षम असणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन उपसंचालक, आरोग्य विभाग, लातूर रेखा गायकवाड यांनी रमाई जयंती कार्यक्रमात व्यक्त केले. राजा सिद्धोधनचॅरिटेबल ट्रस्ट लातूर च्या वतीने आयोजित रमाई जयंतीच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या.

प्रारंभी तथागत गौतम बुद्ध डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य डॉक्टर दुष्यंत गटारे यांच्या प्रास्ताविकानंतर समाजातील कर्तृत्वान महिलांना रमाई पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यामध्ये डॉक्टर रेखा गायकवाड मॅडम, डॉक्टर अस्मिता जाधव मॅडम, अँड काजल सूर्यवंशी मॅडम यांचा ट्रस्टच्या वतीने गौरवचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. रमाई जयंतीच्या निमित्ताने लातूर महानगरपालिकेत नव्यानेच निवडून आलेल्या नगरसेवक सचिन जी गायकवाड. मंगेश सोनकांबळे, मनीषाताई बसपुरे, रुबीनबी शेख यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुण्यांनी यांनी उपस्थितांना सखोल असे मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन ट्रस्टचे अध्यक्ष . आनंद सोनवणे यांनी केले. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ट्रस्टच्या पदाधिकारी विक्रम चिकाटे गौतम सूर्यवंशी सूर्यकांत दांडे दगडु साळवे हेमंत जाधव विशाल कांबळे धम्मरत्न सोनवणे राजकुमार राऊत वसंत सूर्यवंशी वसंत वाघमारे विनोद दांडे गुलशन कांबळे धम्मपाल माने सुरेश कांबळे परिश्रम घेतले. कार्यक्रमाला लातूर पूर्व भागातील अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित यावेळी त्यांनी प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, पोषणयुक्त आहार, मातृआरोग्य व जनजागृती यावर विशेष भर देत रमाईंच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास विविध मान्यवर, महिला कार्यकर्त्या व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आहिल्यादेवी आश्रम शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न; विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी ह्या स्नेहसंमेलनाचे आयोजन एक सकारात्मक पाऊल - डॉ. चामणकर




केज/प्रतिनिधी-इतर मागास बहूजन कल्याण विभाग अंतर्गत आणि श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस संचलित अहिल्यादेवी प्रा. व उच्च प्राथमिक आश्रमशाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन १० ऑक्टोबर रोजी शाळेच्या प्रांगणात अतिशय उत्साहात आयोजित करण्यात आले. या स्नेहसंमेलनात ज्ञान आणि कलेचा अविष्कार ह्या दोन प्रमुख गोष्टींवर विशेष भर देण्यात आला.

स्नेहसंमेलनात प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सचिन कस्तुरे, डॉ. देवराव चामणकर, डॉ. संदीप जैन, मा. मु. हंडीबाग सर, शाळेचे मुख्याध्यापक श्री. धेंडे सर, मा. थळकरी सर, पत्रकार विजय आरकडे, मा. लाडेकर सर, पालक केकाण सर, नागरगोजे सर, नखाते सर यांची उपस्थिती होती.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. सोन्नर सर यांनी स्नेहसंमेलनाची प्रस्तावना केली. यावेळी त्यांनी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या विविध सुविधांबद्दल तसेच शालेतील शिक्षण आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाबद्दल सविस्तर माहिती दिली.

प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे खूप कौतुक केले आणि शाळेतील विद्यार्थ्यांना या मंचावर आपले कला कौशल्य प्रकट करण्यासाठी दिलेल्या संधीसाठी शाळेचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, अभिनय, व इतर मनोरंजनात्मक कार्यक्रमांमध्ये आपल्या कला सादर केल्या आणि शाळेचा प्रत्येक कोपरा सकारात्मक वातावरणाने गाजला.

आश्रम शाळेतील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबतच त्यांच्या कलागुणांना वाव देण्याचा महत्त्वपूर्ण कार्य प्रगतीसाठी चालू आहे, असे प्रमुख पाहुण्यांनी सांगितले.

शाळेच्या विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी ह्या स्नेहसंमेलनाचे आयोजन एक सकारात्मक पाऊल ठरले आहे.

या कार्यक्रमाचे भारदार सुत्रसंचालन पोटभरे सर यांनी केले तर स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. यावेळी परिसरातील नागरिक व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# बॉक्सर अविनाश सकनुरे याची विद्यापीठ संघात निवड



मुरुड/ महेंद्र आल्टे: स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व शहीद भगतसिंग महाविद्यालय किल्लारी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल लातूर येथे आयोजित आंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग (पुरुष) स्पर्धेमधून ४७ ते ५० किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवल्यामुळे श्री अविनाश उद्धव सकनुरे (एम. ए.भाग -एक) याची निवड गुरुवार दिनांक ५ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी २०२० दरम्यान जिल्हा क्रीडा संकुल लातूर येथे आयोजित विद्यापीठ स्तरीय मार्गदर्शन व सराव शिबिरासाठी झाली होती.

दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी अखिल भारतीय विश्वविद्यालय स्पर्धेसाठीच्या विद्यापीठ संघाच्या अंतिम निवड चाचणी स्पर्धेमध्ये बॉक्सर अविनाश सकनुरे याने प्रतिस्पर्ध्यावर दणदणीत विजय संपादन केला.स्पर्धेच्या ३-३ मिनिटाच्या ३ फेऱ्यांपैकी पहिल्याच फेरीमध्ये १, १/२ मिनिटाच्या आतच प्रतिस्पर्ध्यास नॉकआऊट पंच मारून विजय संपादन केला. त्यामुळे त्याची निवड २ ते ७ मार्च २०२६ रोजी कुरुक्षेत्र विद्यापीठ कुरुक्षेत्र (हरियाणा) येथे संपन्न होणाऱ्या अखिल भारतीय अंतर विश्वविद्यालयीन बॉक्सिंग (पुरुष) स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यासाठी तो २७ फेब्रुवारी २०२६ रोजी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात रिपोर्टिंग करण्यासाठी रवाना होणार आहे.

मुरुड सारख्या ग्रामीण भागातील संभाजी महाविद्यालयातून अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेपर्यंत झेप घेणाऱ्या खेळाडूचे सर्वत्र कौतुक होत आहे. महाविद्यालयातर्फे सकनुरे याचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. अशोक काळम, क्रीडा संचालक प्रा. मधुकर क्षीरसागर, श्री. अरूण सवासे उपस्थित होते. महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रोफेसर मधुकर क्षीरसागर यांनी त्यास वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले. समाज जागृती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, श्री बी.एस.(दादा) पटाडे, संस्थेचे सचिव एडवोकेट विजयजी पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम, सर्व प्राध्यापक वृंद यांनी अभिनंदन करून सदर खेळाडूस पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# वेळूवन बुद्ध विहारात माता रमाई जयंती सोहळा उत्साहात संपन्न



केज/प्रतिनिधी-भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेच्या वतीने प्रज्ञासूर्याची साऊली, त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती साजरी करण्यात आली. शहरातील भीमनगरमधील वेळूवन बुद्ध विहारात हा जयंती सोहळा संपन्न झाला.

सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध,बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून सामूहिक त्रिशरन व पंचशील घेण्यात आले.यावेळी उपस्थित भारतीय बौद्ध महासभेचे शहर अध्यक्ष जयपाल मस्के यांनी सर्वांना माता रमाई यांच्या जयंतीच्या निमित्ताने मंगलकामना व्यक्त केल्या व आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना ते म्हणाले डॉ. बाबासाहेबांचा आंबेडकरांचा जीवनप्रवास जेवढा संघर्षमय आहे तेवढाच माता रमाईंचा खडतर आहे.पतीने शिकावे व साहेब बनावे यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले त्याग केला. बाबासाहेब शिक्षणासाठी परदेशात असताना संसाराचा गाडा नेटाने सांभाळला.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उत्तुंग समाजकार्यात रमाई यांनी खंबीर साथ दिली. त्यांचा साधेपणा,कारुण्य,विचार आणि त्याग सगळ्यांना सतत प्रेरणा देत राहील.यावेळी बोलताना त्यांनी माता रमाई यांच्या आयुष्यातील प्रसंग सांगितले.नव प्रशिक्षित समता सैनिकांच्या गणवेश व संचलनाबाबत चर्चा झाली व आवश्यक सूचना देण्यात आल्या.

कार्यक्रम प्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे चंद्रकांत मस्के यांनीही आपले विचार मांडले. भारतीय बौद्ध महासभा शहर महिला शाखेवर अनिता गायकवाड व उषा साखरे यांची निवड झाल्याबद्दल उपस्थित पदाधिकारी यांनी धम्मयान दिनदर्शिका व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी उषा साखरे यांनीही आपले मनोगत मांडले.

कार्यक्रम प्रसंगी विहारात भारतीय बौद्ध महासभेचे माजी शहराध्यक्ष डॉ. प्रभाकर ठोके, भारतीय बौद्ध महासभेचे महेंद्र मस्के,कल्याण मस्के,दीपक मस्के. महिला शाखेच्या सुनीता कांबळे, सुरेखा मस्के,कुसुम मस्के,रत्नमाला मस्के, आशा मस्के, मैना मस्के, अविद्या मस्के, अनिता हजारे, हौसाबाई हजारे, जनाबाई मस्के, पुष्पा मस्के, शीतल लोमटे, वर्षा हजारे, सावित्राबाई कांबळे, गंगुबाई मस्के व इतर बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका यांची उपस्थिती होती.

# कुंभेफळ येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत संत रविदास महाराज जयंती साजरी.



केज/प्रतिनिधी-जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंभेफळ केंद्र केज मुलांची ता .केज शाळेत संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले. संत रविदास महाराज यांचा १३७६ मध्ये पोर्णिमेच्या दिवशी उत्तरप्रदेशात वाराणसी शहरातील गोबर्धनपुर मध्ये झाला. संत रविदासांचा जन्म रविवारी झाल्याने त्यांचे नाव रविदास असे ठेवले.वडील संतोख दास व आईचे नाव कर्मादेवी होते.ते एक भारतीय महान संत, कवी व समाजसुधारक होते.ते दयाळू व दानवीर होते. त्यांना संतशिरोमणी संत गुरु ही पदवी देण्यात आली. त्यांना मन चंगा तो कठौती में गंगा यामधून ईश्वरभक्ती फक्त देखावा नसून मनातुन सच्ची भक्ती असावी व भक्तीमध्ये सच्चाई, प्रेम आणि सेवाभाव असावा असे सांगितले.त्यांनी जातीभेद व अस्पृश्यता विरोध केला व सामाजिक ऐक्य निर्माण केले.त्यांनी लोकांना खरी भक्ती व सद्मार्ग दाखवून भक्तीत बाहेरील अवडंबर नसावा असे सांगून आत्मज्ञान मार्ग दाखविला. त्यांनी भक्तीगीतातुन समाजप्रबोधन केले.असे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंभेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी आपल्या प्रास्ताविकात सांगितले.या शाळेतील प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ.रामकिशन ग्यानबा मुळे सर, गणित विज्ञान विषयाचे प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री संदीप मेघराज ठोंबरे सर, श्री राहुल बजरंग बचुटे सर, श्री आकाश दत्तात्रय लोंढे सर, श्री आबासाहेब तुळशिराम धपाटे सर, श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम, श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम, ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे मॅडम यांनी विचार व्यक्त केले.यावेळी शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षण प्रेमी नागरिक,सर्व शिक्षक शिक्षिका वृंद,पीएम पोषण शक्ती निर्माण योजना कामगार स्वर्णमाला पवार, अनिता पवार, विद्यार्थी ,विद्यार्थिनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री राहुल बजरंग बचुटे सर यांनी केले व श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम यांनी आभार मानले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.